# प्रभुतरुण

| वर्ष ५१ | अंक ०४ | मुंबई | नोव्हेंबर, २०१७ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३)

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर**

*कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटचे**


*संपादकीय*

## आनंदाचा गुणाकार

—सुहासिनी कीर्तिकर

मित्रहो, दिवाळी आली; गेलीही. अर्थात मी हा लेख लिहीत असताना अजून देवदिवाळी बाकी आहे. पण असो. सण येतात; जातात. आता येत्या अमावस्येपासून माझ्या घराच्या (अंगणात?) परिसरात माहेश्वरी देवीचा उत्सव साजरा होईल. आपल्या ज्ञातीतील काही घराण्यांची ती कुलदेवता. पा. प्र. चॅरिटीजच्या देखरेखीखाली जबाबदारीने हा उत्सव दरवर्षी केला जातो. पूर्वीसारखे जत्रेचे भव्य स्वरूप नसले तरी आनंदाचा, समाधानाचा गुणाकार तोच आहे. दिवाळीतही महागाई होती; पण पूर्वी असणारी थंडीची गंमत नव्हती. सुकडी घरोघर झालीच; पण विकतच्या पदार्थांवर अनेकांची भिस्त असल्याने तेवढी चवीची बहार नव्हती. नवीन खरेदी, नवीन कपडे-दागिने सगळे दिवाळीच्या नावाने झालेच; पण पूर्वीसारखा आनंद वाटून घ्यायला घरोघरी जाण्यासाठी वेळ नव्हता. बाहेरगावी जाणं, सिनेमानाटकं बघणं, अगदीच नाही तर; घरच्या टी.व्ही.समोर दैवक मांडल्यासारखं बसून रहाणं... असाही अनेकांनी पर्याय निवडला. हां! एसेमेस्, संदेशांची देवाणघेवाण मात्र खूप आणि उत्साहाने झाली. म्हणजेच दिवाळीचा आनंद प्रत्यक्ष न भेटताही सगळ्यांनी असा वाटून घेतला. दिवाळीची शाळाकॉलेजांना सुट्टी असली तरी क्लासेस चालूच. त्यामुळे पूर्वीसारखे 'सुट्टी, सुट्टी' म्हणून मनांनी आनंदाने उड्या नाही मारल्या. क्लासेसची नाळ न तोडता जेवढं 'क्लासिक' होता येईल तेव्हढीच दिवाळीची रंगतसंगत. 'एसेमेस'ने माणसांना भेटणं शक्य झाल्यानं अनेकांनी आनंदाने 'दिवाळी पहाट'चे कार्यक्रम जवळ केले. अभ्यंगस्नान होवो न होवो; 'दिवाळी पहाट' मात्र हल्ली जोमात 'उगवते'! कुठे शास्त्रीय संगीताची मैफल, कुठे 'देवगाणी', कुठे सिनेसंगीताचा जलसा, कुठे संगीतकाराची मुलाखत... अशी सांस्कृतिक दिवाळी अनेकांना समृद्ध करून गेली. आवाजाच्या प्रदूषणाचे भान ठेवून फटाक्यांची आतशबाजी यंदा कमीच झाली; पण दिव्यांची रोषणाई खूपच झाली.

सांगायचा मतलब इतकाच की पूर्वीच्या सणावारांचे स्वरूप बदलले, ते साजरा करण्याची रीतभात बदलली तरी; समाधानाचा, आनंदाचा गुणाकार तोच आहे. दिवाळी अंक तर मराठी संस्कृतीचे श्रीमंतपण. पाचशे सहासष्ट दिवाळी अंक यावर्षी प्रकाशित झाले. काहींनी ललित साहित्य, वैचारिक साहित्य यांचा तोल साधत आपला दर्जा नेहेमीप्रमाणे सांभाळला. 'प्रभुतरुण'चा दिवाळी अंक याचा अनुभव देऊन गेलाच. पण त्यातही यावर्षी मार्केटिंग समोर ठेवून 'झी मराठी'ने दिवाळी अंक काढून विक्रमच केला. 'ग्रंथाली' त्यात सहभागी होती. त्या ग्रंथालीचे सुदेश हिंगलासपूरकर मला म्हणाले की, 'पहिली आवृत्ती पन्नास हजारांची आहे. सगळे 'सेलेब्रिटी' असल्याने ही आवृत्ती संपणारच.' काय आश्चर्य! त्यांचा हा अंदाज सहीसही खरा ठरला. दोन दिवसांत पहिली आवृत्ती संपली. दुसरी काढली, तीही संपली तीन दिवसांत. शंभराहून अधिक वर्षांची दिवाळी अंकाची परंपरा असे नवीन वळण घेते झाली. या अंकात वैचारिक भान नाही, टीव्हीमाध्यम वा प्रसारमाध्यमावर गंभीर उहापोह नाही, किंवा कथा-दीर्घकथा असा मामलाही नाही. तरीही 'अजून बकरी पाला खाते' प्रमाणे वाचक अजूनही दिवाळी अंक उचलून धरतात म्हणायचे!

कालभानाप्रमाणे दिवाळी साजरी करण्याच्या आपल्या संकल्पना कशा बदलत गेल्या, कशा बदलतात; याची ही काही उदाहरणेच. यामुळे आनंद विरजला का?... नाही! त्याचा वर म्हटल्याप्रमाणे गुणाकारच झाला.

परवा संगीतकार, कवी, गायक वगैरे वगैरे असणाऱ्या यशवंत देवांनी वयाची ९१ वर्षे पूर्ण केली. नऊ दशकांची बदलती संस्कृती पहाणारा हा आस्वादक माणूस. आजही तितकाच ताजा आहे. 'पूर्वी असं होतं... आज ते नाही' असा अजिबात आव नाही. मागच्या पिढीबद्दल अभिमान आणि आजच्या पिढीला नावं ठेवणं... अजिबात नाही. या वयातही बसून बोलणे नाकारणारा हा 'देव' माणूस विनोदी किस्से ऐकवतो, लोकांना हसवतो. आजच्या गाण्यांचे, संगीतकारांचे कौतुक करतो. मुंबई मराठी साहित्य संघाच्या वर्धापनदिनी ते लागोपाठ दोन दिवस आले. 'हे जीवन... सुंदर आहे' या वृत्तीने ते तेव्हा म्हणाले, ''मी ज्योतिष्यावर अवलंबून नाही. पण तुम्हाला सांगतो; माझ्या हातावर एक ठळक रेषा आहे. कोणती? स्मितरेषा! प्रत्येकाच्या हातावर ही 'एखादी तरी स्मितरेषा' असायलाच हवी.'' 'करतली आवळा' म्हणतात ना; त्याप्रमाणे त्यांनी हे सार थोडक्यात सांगितले. त्यामुळे पूर्वीची दिवाळी अशी होती, आजची दिवाळी अशी आहे... अशी तुलना कशाकरिता हवी? पूर्वी सण साजरा करण्याची पद्धत वेगळी होती, आज वेगळी आहे. पण आनंदाचा गुणाकार तोच आहे ना?

'प्रभुतरुण' दिवाळी अंकही तोच आणि तसाच होता ना? विशेष संशोधन विभाग, कथा, कविता, लेख, विनोद यांनी रंगलेला हा अंक. त्यात जुने जाणते होते; तसेच नवीनांनीही वाचनाच्या आनंदात भर घातली. व्यंगचित्रे, चारोळ्या, वात्रटिकांनी तो आनंद वाढविला. या नवीनांनी 'प्रभुतरुणा'ची कास पुढेही धरावी, आपली भर घालत जावी. यशवंत देवांनी 'एखादी तरी स्मितरेषा' हवी असं म्हटलं. त्याच स्मितरेषेच्या समांतर माझ्या संपादकीय तळहातावर आणखी एक रेषा आहे. समाधानाची!

हे समाधान मित्रहो, तुमच्या प्रतिक्रियांमुळे मला लाभलं. तसेच रावबहादूर धुरंधर यांच्यावरील विशेष विभागानेही दिलं. श्री. संदीप दहिसरकर हे धुरंधरांवर खास अभ्यास करीत आहेत. त्यांनी या दीडशेव्या जयंतीची बातमी लागताच डहाणूकर कॉलेज सभागृहात प्रदर्शन भरवलं. 'भवन्स जर्नल' मध्ये लेख लिहिला. श्री. सुहास बहुळकरांनी 'हंस' च्या दिवाळी अंकात धुरंधरांवर खास लेख लिहीला. संशोधन करता करता अशी आनंदाची लागण झाली. त्याचं समाधान मला विशेष आहे.

स्मित, समाधानाच्या समांतर रेषा वाचकहो, तुमच्याही तळहातांवर, निरंतर उमटू द्यात. अर्थात त्यासाठी तुम्ही 'प्रभुतरुणा'चा धरलेला मैत्रीचा हात मात्र सोडता कामा नये. तो तुम्ही सोडणारच नाही; याची खात्री असल्यानेच मी अधिक समाधानी आहे.

तर सतत भेटत राहू...!

*

# शिक्षणपद्धत: काल व आज

**⋆ हेमंत विनायकराव तळपदे ⋆**

अनादिकालापासून ते उत्क्रांती अवस्थेपर्यंत मानव नेहमीच काही ना काही शिकत राहिला. या स्तुत्य गुणामुळे हा मानव इतर सजीवांवर सहजपणे मात करू शकला. अगदी पौराणिक कथांमध्येही आपणास मानवाच्या शिक्षण पद्धतीविषयी माहिती मिळते. रामायणकाळात राम-लक्ष्मणांना शिकण्यासाठी आश्रमात पाठविण्यात आले. तेथे धर्मशास्त्र, धनुर्विद्या, अस्त्रशास्त्र या विषयांचे शिक्षण त्यांनी निसर्गाच्या सान्निध्यात हस्तगत केले. श्रीकृष्णाने सांदिपनी ऋषींच्या आश्रमात सुदाम्याबरोबर शिक्षण घेतले. त्याकाळी भुर्जपत्रांचा उपयोग दगडी पाटी अथवा वह्यांप्रमाणे होत असे तर, बोरूंचा उपयोग पेनाप्रमाणे होत असे. इतकेच नव्हे तर; ऋषीमुनी आपल्या विद्यार्थ्यांकडून संस्कृत श्लोक वदवून घेत असत. विद्यार्थी देखील केवळ पंचा अथवा सोवळे नेसून अध्ययन करीत असत. इतकेच नव्हे तर अध्ययन पूर्ण होईपर्यंत शिष्यांना गुरूगृही राहून आश्रमाची सर्व कामेही करावी लागत व अध्ययन पूर्ण झाल्यावर गुरू त्यांची परीक्षा घेत असत. शेवटी परिपूर्ण विद्यार्थ्यास गुरुला गुरुदक्षिणाही द्यावी लागत असे. तसे पाहता आजही एकलव्याची गुरुदक्षिणा सर्वात महत्त्वाची वाटते. असो.

काळ पुढे चालला अन शिक्षणपद्धतीत बदल होऊ लागले. गुरु शिष्याचे नाते बदलून गुरुजी - विद्यार्थी नाते रुजू झाले. कागदाचा शोध लागला व भुर्जपत्रांच्या जागी वह्या आल्या तर; बोरूंची जागा पेन्सिली व फाऊंटन पेनांनी घेतली. ऋषींच्या जागी गुरुजी आले व सोवळे जाऊन शर्ट, धोतर, लेंगा अशी गुरुजींची करारी मूर्ती अवतरली. विद्यार्थीदेखील काळ्या पाटीवर दगडी पेन्सिलीने ग,म,भ,न अशी मुळाक्षरे गिरवू लागले. पण या गुरुंविषयीचा आदर कणभरही कमी झाला नाही. माझ्या मते भारतातल्या प्राथमिक विद्यालयाच्या गुरुंना तो आत्मीय आदर मिळतो तो एखाद्या देशाच्या पंतप्रधान अथवा राष्ट्रपतींनाही मिळत नसावा.

झाडाखालच्या शाळा संपल्या आणि दगडी भिंतीमध्ये शाळा सुरू झाल्या. नैसर्गिक मैदाने संपली व शाळेचे आवार अवतरले. गुरुजींचा मुलांना शिकविण्याचा कल मात्र जास्तीत जास्त पाठांतराचाच असे. छडी लागे छमछम अन् विद्या येई घमघम' हा कानमंत्र बऱ्याच गुरुजनांना अवगत असे व त्याचा उपयोग हे गुरुजन विद्यार्थ्यांवर मुक्तपणे करत. याला पालकांचाही काहीही आक्षेप नसे. याउलट लहान मुलीचे कान सोनाराकडून टोचले जावेत याप्रमाणे पालकही आनंदाने गुरुजींना मुलाला चांगलेच चोपावे असे आर्जव करत असे. गुरुजीही मुलाचे कानफट लाल करताना जराही संकोच बाळगत नसत. पु. ल. देशपांडेंचे बिगरीचे 'सालंकृत' कानपिळीचे तपशील आठवले की नाही? पण एक गोष्ट मात्र खरी की या गुरु-विद्यार्थी नात्यात व्यावसायिकता अथवा धंदेवाईकपणा जराही नसे. माझा विद्यार्थी हा केवळ शिक्षणातच नव्हे तर संस्कारानेही सबल असला पाहिजे हा गुरुजींचा आग्रह असे. त्यासाठी गुरुदेखील काळवेळ जास्त अर्पण करण्यास सदैव तत्पर असत. गुरुजींना वा बाईंना भर चौकात पदस्पर्श करून वाकून नमस्कार करताना विद्यार्थीही संकोचत नसत.

पुढे काळ बदलत गेला. गुरुजी-विद्यार्थी नाते टीचर-स्टुडंटमध्ये रुपांतरीत झाले. धोतरांची जागा पॅन्ट जीन्सने घेतली. तर अंगरख्याऐवजी शर्ट टाय-सूट आले. सर अथवा मॅडम ही नवीन संबोधने आली. आणि तेव्हाचे गबाळे गुरुजी टिपटॉप झाले. एक गोष्ट मात्र खरी की ज्ञान देण्याचे व्रत सर-मॅडम युगातही तसेच चालू राहिले. फरक इतकाच की या शिक्षण देवाण-घेवाणीच्या पद्धतीत एक व्यावसायिकता आणि धंदेवाईकपणा आला. स्वत: शिक्षकांना शिक्षण पूर्ण करून शिक्षकाची नोकरी मिळेपर्यंत अनेक अडचणी, अनेक प्रकारचे खर्च यांचा सामना करावा लागतो. आता बीएड कोर्सला सरकारी महाविद्यालयात प्रवेश मिळाला नाही तर खाजगी महाविद्यालयात लाख रुपयांहून अधिक फी भरावी लागते. त्यामुळे तो शिक्षक अध्यापन सुरू केल्यावर केवळ पगारच नव्हे तर खाजगी क्लासेसमध्ये शिकवून अथवा स्वत:चे शिकवणी वर्ग चालवून अधिकाधिक पैसा कसा कमावता येईल याबाबत प्रयत्नशील असतो. आजचे विद्यार्थी हुशार आहेतच; पण पूर्वीच्या मानाने ते जास्त चौकस होत आहेत. माझ्या मते ही चांगली गोष्ट आहे. पूर्वी आईबाबांनी सांगितले म्हणून मी डॉक्टर, वकील, इंजिनियर झालो असे सांगणारा विद्यार्थी आज अनेक पर्यायी शिक्षणाचा विचार करतो व त्यातूनच आपल्याला जमेल तो योग्य पर्याय निवडतो. या त्याच्या निर्णायकी

(पान ४ कॉलम २ वर)

## स्वागत

**-सौ. सुरेखा सुरेश नवलकर**

चंद्र नभीचा ढळेल का कधी?
तारे नभीचे मिळतील का?
कल्पतरूची फुले कोमल
ओंजळीत माझ्या पडतील का?
पाऊलवाट रम्य इंद्रधनुची
मार्ग पावलांना दावील का?
सप्तरंगी पायघड्या सुंदर
सौख्य, शीतलता देतील का?
नभांगणाचे रूप आगळे
दारी माझ्या बहरेल का?
स्वप्न नसावे सत्य ठरावे
चमत्कार हा कुणी घडवील का?
चमचमणारे तारे नभीचे
घरात माझ्या हसतील ना?
दार स्वर्गीचे उघडूनी क्षणभरी
अमृत सिंचन कुणी करतील का?
कवी कल्पना ह्या खुळीची
अशी मस्करी कुणी करतील का?
की भावविश्व हे प्रत्येकाचे जाणुनी
स्वागत कवितेचे ह्या होईल का?

## अनुवाद-संवाद

### Poetry Uninhibited

By SHANOOR MIRZA

Poignant emotions, unclutterd, unbridded,unfettered
Runway flow og thoughts all seized up
In a symphony of rhythmic strokes in verses
That is the power of reading what stimulates your mind
To unimaginable realms of poetry.
Unhinfered, mindless pursuit of release of bonded hurt,
Clausterphobic, bridled, saddled humainity
Limitless, perfect harmony, bodyless soul, passonate disposition
Demarcated vocabulary, infinite ceaseless out pourings,
Countless encounters, poigmamt melodies, melodious poesy
Imperfect perfections, boundless zest, sematic expositions
Fearless, relentless, insurmounttable
Release from limitlee fears...
The power of poetry

from (Expressions, Insight HITVADA, Nagpur)

⁕

### कविता मुक्ता

अनुवादिका - **कल्पना सुभाष कोठारे**

हेलावून टाकणाऱ्या, सुटलेल्या बटांसारख्या विस्कळीत मुक्त भावना
इतस्तत: विखुरणारे विचार, तुंबविणाऱ्या भावना-
सुरेल वाद्यवृंदाच्या तालांचे कडव्यात गुंफलेले फटकारे-
अशी ही वाचनाची किमया- मनाला ढवळणारी!
थोपविता न आलेला, निरुद्देश, मानसिक भावनांचा पूर-
भीतीदायक जादुई पेडांची गुंफण अन् माणुसकी जणु अश्वारूढ!
अपार, असीम पूर्णत्व, अशारीरिक मन, झपाटलेला उद्रेक
सीमित, अंतिम तरीही अनंत भावना ओतीव-
अमाप गाठीभेटी, छळवादी सूर, वर्णने उघडी-शाब्दिक
अपार भीतीपासून शाश्वत मुक्ती-
अशी ही कवितेची महती!

⁕

**कथाकली**

# मनोरा

-सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर

मनोरा सोडताना कंपाऊंडच्या प्रवेशद्वारामधून सगळ्यांनीच मनोऱ्याकडे बघितलं. अचलाला वाटलं - काही महिन्यांपूर्वी आपण इथं आलो ते खूप उत्सुकता, थोडी हुरहूर आणि जुना फ्लॅट सोडल्याचं थोडंसं दु:ख नी मुख्य म्हणजे मनोऱ्याबद्दलचं खूप सारं कुतुहल मनात घेऊन... आता जातोय ते इथलं न भावलेलं जग सोडल्याचा आनंद त्याहीपेक्षा जुना फ्लॅट परत मिळाल्याचा आनंद नी त्या फ्लॅटची ओढ घेऊन.. पण खरा आनंद आहे की मनोरा आज पूर्णपणे हरला. त्याचं फक्त सुख उरलं. आशय मात्र हरवला.

अरविंदच्या मनात आलं - नाही म्हटलं तरी श्रीमंत थाटाचं आपसूक राहणीमान ह्या मनोऱ्यानं दिलं होतं, एका वेगळ्या विश्वाची ओळख घडवली होती, मानवी स्वभावावरचं मनोऱ्याच्या संस्कृतीचं लिंपण दर्शविलं होतं. पुन्हा कधीही आपलं स्वत:चं असं विश्व, असा श्रीमंती थाट अनुभवायला मिळणार नव्हता आणि मनोऱ्याशिवाय तो श्रीमंती थाट अशक्यच... मनाच्या कोपऱ्यात जाणवतंय की मनोरा जिंकला.

सौरभ मात्र वारंवार मनोऱ्याकडे वळून वळून बघत होता. आपलं स्वप्न आज आपण अपुरं सोडून जातोय ही जाणीव त्याचं मन पोखरत होती. मनोऱ्यामधलं नुसतं आपलं हक्काचं अस्तित्व कितीतरी सुखं पायाशी आणून टाकीत होतं. इथं राहणं जी जीत होती आणि सोडणं ही हार... मनोरा मात्र एखाद्या निर्विकार शिल्पासारखा उभा होता. मनोऱ्याला ना त्यांच्या येण्याचं सुख होतं ना त्यांच्या जाण्याचं दु:ख.

त्यांची मोटार पुन्हा जुन्या फ्लॅटच्या दिशेनं वाटचाल करीत होती. मागून दुसऱ्या मोटारीतून सृष्टी, अनीश येत होते. तिथं पोहोचल्यावर अचलानं पहिल्यांदा आपल्या पूर्वीच्या फ्लॅटकडे नजर टाकली. प्रेमाची, आत्मीयतेची, जिव्हाळ्याची.. आणि अतीव आनंदाची. जणू सासरी गेलेल्या मुलीची माहेरी चार दिवसांसाठी आलेल्या लेकीची ती नजर होती. फरक इतकाच होता की आता ती ह्या फ्लॅटची सोबत सोडून मुळीच कुठेही जाणार नव्हती. अचलाला अजूनही हे सर्व स्वप्नच वाटत होतं... तिच्या मनात आलं - किती बरं झालं हा फ्लॅट आपण ठेवला होता ते.. त्यामुळं मनोऱ्याचे वरचे काही मजले बेकायदेशीर ठरले म्हणून पाडणार हे कळल्यानंतरही 'कुठे जायचं' ह्या प्रश्नाचं दडपण आलं नव्हतं.

सामान कालच पाठवलं होतं त्यामुळे फर्निचर लावण्याचा प्रश्नच नव्हता. सर्वांनी फ्लॅटमध्ये प्रवेश केला आणि हाश्श हुश्श करीत पंखा चालू करून सगळे कोचावर टेकले. आणि...

समोरच्या उघड्या दारातून सुनीता चहाचा ट्रे हातात घेऊन आनंदसह प्रवेशली नी म्हणाली - 'हॅलो, मी सुनीता आनंद परांजपे. हे माझे मिस्टर आनंद. समोरच्या फ्लॅटमध्ये आम्ही राहतो. चहा बिस्किट घ्या अनीशसाठी हा बोर्नव्हिटा... अजून पितो ना?'

सगळेजण एकदम खूप वर्षं मागे गेले आणि खळखळून हसले. तोच प्रसंग, तीच वाक्ये.... पण संदर्भ खूप वेगळा. पूर्वी अनोळखी सुनीता परांजपे असंच बोलत आली होती - आता दोन्ही कुटुंबांच्या जिवलग मैत्रीत मुरांब्यासारखी मुरलेली सुनीता म्हणत होती - ''सुनीता, अजूनही विश्वास बसत नाहीय गं. जाताना कुणी ज्योतिषानं सांगितलं असतं की पुन्हा तुम्ही ह्याच फ्लॅटमध्ये येऊन उर्वरित आयुष्य काढणार आहात तर मी त्याला वेडा ठरवला असता.'

''खरंच आहे - तुला ठाऊक आहे का की नियतीचे खेळ वेगळे असतात आणि प्रत्येक वस्तुचंही नशीब असतं. त्या त्या प्रमाणे ती ती माणसं तेवढा काळ तिथं राहतात.'' सुनंदानं दुजोरा दिला.

''शेजाऱ्यांचंही नशीब असतं बरं का त्याप्रमाणे ते ते शेजारी तेवढा तेवढा काळ लाभतात.'' आनंदनं भर घातली.

''आणि हरवलेले शेजारी पुन्हा परत मिळतात. अरविंदनं सगळ्यांच्या मनातल्या विचारांची पूर्तता केली.

''बरं हे सगळं राहू दे. आज जेवायला आमच्याकडेच या.'' सुनीतानं आग्रहानं सांगितलं.

''नको. आम्ही एवढे काही दमलो नाही आहो.'' - सौरभ म्हणाला.

''असू दे रे. ह्या दोघींना कशाला कामाला लावतोयस? इथं तुमच्या त्या घरातला स्वैपाकी नाही. नवीन स्वैपाकी मिळायला वेळ लागेल.'' - सुनीता सहज बोलून गेली.

आणि सौरभच्या मनातील इथं यावं लागण्याच्या अढीला पहिला पीळ बसला... नाईलाजानं त्यानं सत्य स्वीकारलं.

दुपारच्या जेवणानंतर अचला समाधानानं गाढ झोपी गेली. आईच्या कुशीत शिरून निवांत झोपते तशी...

हळूहळू फ्लॅटमधल्या रोजच्या व्यवहारांना गती आली आणि तेवढ्याच वेगानं सौरभ वैतागत चालला होता...

एकदा तो हॉलमध्ये लॅपटॉपवर काम करीत असतानाच सुनीता घरात शिरली 'काय हे सौरभ? रविवारीसुद्धा काम? गरम गरम अळुवड्या आणल्यायत - ये खायला '' असं म्हणत ती स्वयंपाकघरात गेली. थोडा वेळ मोठ्यामोठ्यानं गप्पा मारून ती गेली.

त्याबरोबर सौरभ ताडकन उठून आत गेला नी म्हणाला - ''आई तरी मी तुला म्हणत होतो की ह्या फ्लॅटमध्ये नको जाऊं या. - एक मिनीटाची शांतता मिळेल तर शपथ. सारखं कुणीना कुणी कडमडत असतं. कुणीच नाही तर आनंदकाका आणि सुनीताकाकी आहेतच..''

अचला अचंब्यानं पाहतच राहिली नी मग म्हणाली - ''अरे, हळू बोल, शेजारी ऐकूं जाईल नं!''

''छानऽऽ पूर्वी मी मनोऱ्यात सांगायचो हळू बोला तर म्हणायचीस हळू बोलायची सवय नाही नी आता मलाच हळू बोलायला सांगतेयस?''

''पूर्वी नाही ना शेजाऱ्यांचा त्रास व्हायचा तुला? आम्हालाही आता हळू बोलायची.''

''पण मला आता शेजाऱ्यांचा त्रास होतो. आता ऑफीसमध्ये खूप जबाबदाऱ्या पडल्यायत माझ्यावर. त्यासाठी शांतता नको?''

''ह्याचा अर्थ मला वाटतं ह्या त्रासाचं मूळ ती माणसं नसून तुला इथं परत यावंसं वाटत नव्हतं ही भावनाच आहे.''

''होच मुळी. इथं जागा लहान, जास्त नोकर ठेवता येत नाहीत; ह्या दोघी सदानकदा स्वयंपाकघरात, शिवाय अनीशची शाळा लांब पडते. मी दुसऱ्या मनोऱ्यातच जाऊया म्हटलं होतं तर इथं येणं किती फायद्याचं आहे हे पटवलंत मला. शी! सगळाच गोंधळ घालून ठेवलात तुम्ही. रोज मोटारवर कबुतरं घाण करतात, दोन मोटारी पार्क करायला सुद्धा जागा नसते. सतरांदा बेल वाजते. दूधवाला, पेपरवाला, भाजीवाला, शेजारचे, खालचे, वरचे सगळे हजेरी लावतच असतात. मी निक्षून सांगतो, मी पुन्हा मनोऱ्यात जाणार म्हणजे जाणार. आई, तूच म्हणायचीस नं की वरच्या पायरीवर माणूस पटकन जातो. ती मनोऱ्याची पायरी होती. नी खालच्या पायरीवर उतरायला त्रास होतो ती पायरी ह्या फ्लॅटची आहे.

अचलाच्या मनात आलं - मनोरे पायरी पायरीनं उंच झाले नी उंचच राहिले. ती म्हणाली, ''मनोऱ्यात गेलो तेव्हा आम्हीसुद्धा घुसमटत होतो. पण आम्ही त्याची सवय करून घेतली. एकलकोंडेपणानं कंटाळलो तरीही चेहऱ्यावरची स्मितरेषा जपली. पण तुझं लहानपणापासूनचं बरचसं आयुष्य ह्या घरात गेले तरीही तू घुसमटतोस? तुला सुखाची सवय नाही; चटक लागलीय.''


''अगं, पायी चालणाऱ्याला मोटारची सवय पटकन लागते. मोबाईलची सवय पटकन सगळ्यांना झाली. आता पायी चालणं जमत नाही नी मोबाईलशिवाय पूर्वी कसे जगत होतो हा विचारही करवत नाही. फोन घरी विसरलो तर नो मो फोबिया होतो.''

''अरे घरात असताना लँड लाईनवरूनच फोन करतो की आपण. मनोऱ्यात सिल्कच्या साड्या घरात नेसायची मी. पण इथे स्वयंपाकघरात सतत वावरताना कॉटनच्याच साड्या नेसते ना मी?'' अचला म्हणाली.

अरविंदनं तिची समजूत घातली. ''अगं, चालायचंच. दोन पिढ्यांमधल्या विचारांमधलं अंतर आहे हे. आपण नाही का तेव्हा चाळसंस्कृती सोडून इथं आलो? आता पुन्हा चाळीत जायला तयार होऊ का आपण?''

(पान ५ कॉलम ४ वर)

**हसरी रेखा** -प्रदीप कोठारे



# एकटेपणा

**-रंजना तळपदे**

माणूस हा एकटाच जन्माला येतो व शेवटी एकटाच जातो. हे जीवनाचे एकमेव अटळ सत्य आहे. तरीपण एकट्या व्यक्तीवर खूप टीका केल्या जातात. उदा. ती/तो एकटीच राहते, एकटीच फिरते किंवा तिला काय जबाबदाऱ्या नाहीत त्यामुळे ती बेलगाम वागते. ह्या सर्व समाजाच्या टीका झाल्या, पण व्यक्तीशः मला विचाराल तर; एकटेपणा विसरण्यासाठी खूप मार्ग आहेत. आपला समाज जरी सुधारलेला असला तरी काहीशा प्रमाणात जुने विचार धरूनच आहे.

हल्ली लग्न ही संस्था जवळ जवळ मोडकळीसच आलेली आहे. जोडीदार निवडायचा व काही महिन्याने घटस्फोटाला सामोरे जायचे त्यापेक्षा एकटे राहून मनसोक्त जगणे हेच हिताचे आहे. पुरुष काय वा स्त्री काय ती कमकुवत राहिलेली नाही. स्वतंत्रपणे जगू शकते. आर्थिक वा शारीरिक बळ असेल तर कसलीच कमतरता भासत नाही.

कोणाला प्रवासाची आवड असते तर त्यासाठी Sr. Citizen, women's special, Men Special Tours काढल्या जातात. जेणेकरून विविध देशाटनाची हौस फिटवता येते. मुंबईत अनेक एनजीओज निघाले आहेत. तिथे होतकरू स्त्री-पुरुष सेवा करत असतात. हे एक प्रकारे पुण्य कार्यच आहे.

मी स्वतः सिंगल स्त्री आहे. पण भरल्या कुटुंबात राहते. एकटेपणा एवढा जाणवत नाही. तरीपण माझ्या मते स्त्री ही स्वतंत्र असल्यामुळे ती एकटी राहिली तरी काही वावगं ठरणार नाही. उलट ती मनसोक्त जगू शकते. कोणाच्याही मध्ये ढवळाढवळ न करता. कारण जरी ती निर्णय घ्यायला समर्थ असली तरी तिचे निर्णय भरल्या कुटुंबात मान्य होतीलच असे नाही व तडजोड ही तिला करावीच लागते.

पण एक बाकी खरे आहे की ठराविक वयानंतर तिची तडजोडीची क्षमता मंदावते व मग तू तू, मी मी, ला सुरुवात होते. मतभेद वाढतात. तणाव वाढतो व तिला एकटेपणा जाणवतो. हल्ली काही पूर्वीचे दिवस राहिलेले नाहीत. पूर्वी विधवा, अविवाहीत पुरुष/स्त्रिया एकत्र कुटुंबात राहायच्या व मुकाट्याने मूग गिळून टोमणे-टोणपे खायला लागायचे. पण आजची स्त्री पूर्णपणे स्वतंत्र झालेली आहे. तिला स्वतःची एक जागा/स्थान हवं असते म्हणून ती आपले मनोरंजन ह्या न त्या रितीने करत असते, तर त्याच्यात काही वावगं नाही.

हे माझे मत झाले. व्यक्ती व्यक्ती मध्ये फरक असू शकतो. जीवन जगण्याचा मार्ग हा आपणच शोधून काढायचा असतो, कारण शेवटी सुख हे मानण्यावर असते. मित्र-मैत्रिणींनो हे माझे विचार झाले, बघा तुम्हाला पटतात का. तो ज्याचा त्याचा प्रश्न आहे.

✳

(पान २ कॉलम २ वरून)

प्रक्रियेत तो स्वतः जागरूक असतो.

सध्याची शिक्षणपद्धती एका मोठ्या वैचारिक स्थित्यंतरातून प्रवास करत आहे. सध्या बऱ्याच ठिकाणी वर्च्युअल एज्युकेशनचा उपयोग होत आहे. तर शिक्षणाच्या प्राथमिक स्तरावर वास्तव शिक्षणाला महत्त्व दिले आहे. शिशुवर्ग अथवा पहिली दुसरीच्या मुलांना वांगे जांभळट काळे असते हे पुस्तकातील चित्राद्वारे न दाखवता प्रत्यक्ष वांगे हाताळण्यास देतात. हे मुलांची निरीक्षणशक्ती व मानसिक प्रगल्भता वाढविण्याचे सकारात्मक पाऊल आहे असे मला वाटते. आज सायन्स, कॉमर्स, आर्टस्सारखे तीन चार पर्याय उपलब्ध नाहीत तर, व्यावसायिक शिक्षणाचे बीएसी, बीबीआय सारखे विविध पर्याय उपलब्ध आहेत. केवळ एमबीबीएस पर्याय न उरता नाकाचे तज्ञ डॉक्टर, डोळ्यांचे तज्ञ डॉक्टर असे विशेषज्ञ तयार करणारे पर्याय उपलब्ध आहेत.

संगणकाने तर या शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल केले आहेत. इंटरनेटच्या माध्यमातून हा खजिना विद्यार्थ्यांना परिपूर्ण ठरत आहे. बऱ्याच वेळा हे शैक्षणिक आदान-प्रदान संपर्काशिवायही सहज करता येते. कदाचित यापुढे शाळा कॉलेजांची आवश्यकताही भासणार नाही. विद्यार्थी घरातल्या घरात संगणकाच्या सहाय्याने स्वतःला परिपूर्ण करतील. शिक्षकही त्यांच्या ज्ञानाचा खजिना संगणकाद्वारे रिता करतील असे वाटते.

शेवटी इतकेच सांगावेसे वाटते; शिक्षण पद्धतीत कितीही बदल झाले तरी शिक्षक आणि विद्यार्थी यांचे भावनिक बंधन निरंतर कायम राहील याबाबत शंका नाही. शेवटी इतकेच सांगेन-

शिक्षण केवळ शाळेत मिळत नाही

तर या समाज प्रक्रियेतून मिळवावे लागते

संस्कार केवळ धर्मग्रंथातून मिळत नाहीत

तर ते अंगी बाणवावे लागतात

पद्धत कोणतीही असो तिचा रोख एकदिशी असावा

विद्यार्थी कोणीही असो त्याचा आत्मा शिक्षणात रमावा

✳

# FULL RUPEE

**- Anandlaxmi Madhukar Vijaykar**

*(आनंदलक्ष्मी यांचे २६-१०-२०१७ रोजी निधन झाले. त्यांनी काही वर्षांपूर्वी 'प्रभुतरुणा'तून नियमित लेखन केले. संग्रही असलेले त्यांचे हे अप्रकाशित लेखन या अंकातून प्रसिद्ध करीत आहे. - संपादक)*

He smacked his lips. It was 12 noon. He had nothing in his stomach since eight o'clock that morning when he had just a morsel of biscuit solved from previous day. He stretched himself suddenly; he smelt food that was when he smacked his lips he narrowed his eyes and looked. There was a traffic chowky where he was sitting. A towing Van with it crew was seen and he saw the boys opening dabbas and eating. He again felt the pangs of hungers "Eh subahase aaj koyee bakra nahin mila!"

''Apna kal kaisa jayega re? The traffic chowki was situated at the end of junction of 2 roads meeting. He got up and ran upto the junctions. His eyes glowed, there were 2 cars parked each at the end of the crossing point of 2 roads. He ran back to the traffic chowky

''Saab saab''

''Kya hai re''

''There are 2 cars at the crossing sections parked''

''What ? chalo apna kam hua''

Their dabbas containing meagre meals were already finished. The driver took his sent and the rest of the crew jumped into the moving van. In no time the 2 cars were brought to the traffic chowky and kept with one huge ferk clamped in one tyre of each car. He stood there hopefully.

''Mere liye kuch de dev na saab'' The driver took one look at the boy and fisked out 4 anna coin from his pocket and threw in his direction. He gulped down the words that came upto his lips that was worthless metal. Because he had one such coin in his pocket nobody was willing to give him even half a biscuit for that.

The light at the traffic signal changed to red. He went to the first car. The occupant next to the driver seemed to be in good mood.

''Saar kuch paisa do.''

He put in a hand in his pocket and drew out a single coin & gave him.

''Kya re ekdam mota ho gaya tu'' the driver fired at him. ''Wo coin kidhar bhi chalta nahi wohi de diya.'' He looked at the coin; another 4 anna coin. He ran to the next car. A lory dory couple was busy playing love love.

''Saab kuch do na''

''Darling poor fellow. Give him something na''.

''I do not have any change. I felt some coin in your pocket just now. Give him that.

''Darling stifted her head a little sidways and put his hand in the pocket oncohich her head was vesting.

''Here have this''

He threw the coin to him.''

He caught it deftly. The signal changed. All cars moved on. He looked at the coin. He sat down and he got ecstatic. He began dancing up and down. That was another 4 anna coin.

He now had a full rupee.

✳

## लेखिका

**- सौ. सुरेखा सुरेश नवलकर**

वाटलं मोठी लेखिका व्हावं
खूप काही लिहीत रहावं
गोष्टी कविता लेख फर्डे
लिहिता लिहिता ''फेमस''व्हावं

वेळही त्याला शोधून काढला
इतर कामे पडली बाजूला
''स्वैपाकघरा''चे बनले ''लेखनघर''
भाजीपाल्याचा पसारा तसाच राहिला

तावामागून ताव लिहिता
आनंदात गुंतून गेले मन
सुख सापडले केवढे तरी
दुःख उरले चिमूटभर

लेखची चटणी, कविता भाकर
गोष्टीमध्येच सारम् भातम्
माझ्यापुरता हाच नास्ता, हेच जेवण
अन्नदाता मीच सुखी भवम्

''आई, दे ना खाऊ भूक लागली''
करुणाष्टके ही ऐकता होई मनी
कालवाकालव
पतीराज गर्जती, चला जाऊ हॉटेली
''नको पप्पा, आईच्याच हाताला
खरी चव''

कल्पनेच्या भराऱ्या
उतरल्या हळू जमिनीवर
लेखिका मी बनलेच आहे
होईन फेमस कधी तरी नंतर

✳

## पाठारे प्रभु महिला समाज

पाठारे प्रभु महिला समाजातर्फे बुधवार दिनांक ११ ऑक्टोबर २०१७ रोजी समाजाच्या शिवणवर्गात सायंकाळी ५ वाजता दिवाळीनिमित्त ज्ञातीतील गरजू भगिनींना दिवाळी भेट म्हणून लुगडी वाटप समाजाध्यक्षा सौ. नीता सेंजित व उपाध्यक्षा सौ. साया नवलकर यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच प्रत्येकीस ५ लाडूही देण्यात आले. एकंदर २३ सहावारी साड्या व ८ ड्रेस मटेरियल्स देण्यात आली. याशिवाय 'प्रभादेवी ट्रस्ट' कडून आलेल्या ओटीच्या साड्या व ब्लाऊज पीसही देण्यात आले.

तसेच डॉ. श्रीमती मीनाक्षी शिवनाथ देसाईकडून रुपये ३०००/-, सौ. शोभना नंदकुमार धैर्यवानकडून मातोश्री कै. श्रीमती लक्ष्मी माधव प्रभाकर स्मरणार्थ रुपये १०००/-, सौ. लीना मिलिंद वाझकरकडून पुत्र कै. कुणाल मिलिंद वाझकर स्मरणार्थ रु. १०००/-. सौ. योगिनी शेखर धैर्यवान स्म. रु. ५००/-, सौ योगिता किरण नवलकरकडून रुपये २०००/-, सौ. माधुरी उदय कीर्तिकरकडून रुपये ५००/- श्रीमती नीला विजय त्रिलोकेकरकडून रुपये १०००/- तसेच सौ. निशा राणे जाधवकडून श्री. नंदलाल खंडेराव राणे व श्रीमती कुंदा आनंदराव अजिंक्य स्मरणार्थ रोख रु. २००/- प्रत्येकीस देण्यात आले.

यावेळी समाजाच्या चिटणीस सौ. पल्लवी कोठारे, खजिनदार कुमारी शोभना जयकर, संयुक्त चिटणीस सौ. रश्मा विजयकर, तसेच कार्यकारी समिती सभासद सौ. अक्षदा तळपदे व श्रीमती शिल्पा धुरंधर उपस्थित होत्या.

### महिला समाजाचा कलाविष्कार

१७ सप्टेंबर रोजी पाठारे प्रभु महिला सामाजाचा वर्धापनदिन यंदा ज्ञातीतील भगिनींच्या कलागुणांना वाव देत साजरा झाला. हावरे बिल्डर्सच्या सर्वेसर्वा श्रीमती उज्ज्वला हावरे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी बांधकाम विश्वातील काही अनुभव कथन करीत भगिनींशी संवाद साधला. त्यांच्या हस्ते स्पर्धक विजेत्यांना बक्षिसे दिली गेली. या शुभदिनी झालेल्या रंगारंग कार्यक्रमात डॉ. सुमन सुवर्णकुमार नवलकर यांनी विनोदी कथा सादर केली. सौ. मीना धराधर आंबवणे यांनी कविता पेश केली. सौ. स्वागता प्रियेश विजयकर यांनीही छान कविता सादर केली.

श्रीम. वंदना प्रमोद नवलकरांनी एकपात्री रंजक नाट्यछटा पेश केली. श्रीम. सुरूपा राणे देवरुखकर यांनी जुना काळ जागवत, श्रोत्यांना सामील करून घेत सिनेगीत सादर केले. सौ. विदुला श्रीनल कोठारे यांनी 'सांज ये गोकुळी' म्हणत श्रोत्यांना गीतातील भावनेत चिंब भिजवत 'सावळ्या'ची प्रचिती दिली. भरतनाट्यम् शिकलेल्या कु. अपूर्वा नितीन कोठारेंनी आपल्या नृत्याने प्रेक्षकांना आनंद दिला. कु. स्वरा अनुराग तळपदे हिने अभिनय गीत सादर केले. कु. आदिती आशीष व्यवहारकर, सौ. मयुरा गुंजारव नायक, सौ. संजना दीपक कोठारे, सौ. जान्हवी रितेश कीर्तिकर, सौ. मिहीका मिथील नवलकर या नर्तिकांनी मयुरा नायकच्या दिग्दर्शनाखाली बहारदार नृत्ये सादर केली. यात कु. निष्का दीपक कोठारेने आपल्या थिरकत्या पावलांनी प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाजाध्यक्षा सौ. नीता सेंजित यांनी केले.

### महिला समाजाच्या विविध स्पर्धा

पाठारे प्रभु महिला समाजातर्फे रविवार दिनांक ६ ऑगस्ट २०१७ रोजी घेण्यात आलेल्या स्पर्धांचे निकाल पुढीलप्रमाणे

१) निबंध स्पर्धा - मुलींसाठी (१५ वर्षाखालील)

विषय - माझी आवडती कार्टून व्यक्तिरेखा

My favourite cartoon character

प्रथम क्रमांक - कुमारी आदिती आशीष व्यवहारकर

द्वितीय क्रमांक - कुमारी चैतन्या नितीश कीर्तिकर

तृतीय क्रमांक - कुमारी. अनन्या अश्लेश वाझकर

२) निबंधस्पर्धा - महिलांसाठी

विषय - मोबाईल युग

प्रथम क्रमांक - सौ. मीना धराधर आंबवणे

द्वितीय क्रमांक - श्रीमती सुरुपा राणे देवरुखकर

तृतीय क्रमांक विभागून - सौ. जयमती जयपाल तळपदे

सौ. रजनी नितीन कोठारे

३) काव्य स्पर्धा - महिलांसाठी

विषय - श्रावण

प्रथम क्रमांक - सौ. जयमती जयपाल तळपदे

द्वितीय क्रमांक - सौ. मीना धराधर आंबवणे

तृतीय क्रमांक - सौ. रजनी नितीन कोठारे

पाठारे प्रभु महिला समाजातर्फे रविवार दि. १७ सप्टेंबर २०१७ रोजी घेण्यात आलेल्या पाकसिद्धी स्पर्धेचे निकाल पुढीलप्रमाणे

१) पाकसिद्धी स्पर्धा - मुलींसाठी (१५ वर्षांखालील)

विषय - शेवपुरी बनविणे

प्रथम क्रमांक - कुमारी आशना मिलिंद जयकर

द्वितीय क्रमांक - कुमारी अदिती आशिष व्यवहारकर

तृतीय क्रमांक - कुमारी अवंती असित तळपदे

२) पाकसिद्धी स्पर्धा - महिलांसाठी

विषय - गोड आप्पे बनविणे

प्रथम क्रमांक - सौ. निशा दिपक धराधर

द्वितीय क्रमांक - सौ. पूजा मंदार कोठारे

तृतीय क्रमांक - सौ. विद्या विजय त्रिलोकेकर

⁕

## अक्षरसाहित्य उपक्रम

मुंबई मराठी साहित्य संघातर्फे दि. २ ऑक्टोबर २०१७ पासून एका नवीन उपक्रमाला सुरुवात झाली. गिरगावात मराठी टक्का कमी झालेला असला तरी मराठी वाचनवेडा माणूस अजूनही येथे आहे. म्हणून 'अक्षरसाहित्य' हे नवे दालन साहित्य संघातर्फे सुरू केले गेले. याच्या प्रमुख आहेत प्रा. सुहाहिनी कीर्तिकर. त्या साहित्यशाखेच्या सह-कार्यवाह म्हणूनही रुजू झाल्या. दिनकर गांगल यांच्या हस्ते या दालनाचे उद्‌घाटन झाले. या दालनात १३ प्रकाशकांची आणि साहित्य संघाची प्रकाशने आकर्षक पद्धतीने मांडण्यात आली आहेत. कुणीही रसिकाने यावे, पुस्तके पहावीत, तेथे बसून वाचावीत वा विकतही घ्यावीत... अशी सोय आहे. एका महिन्यात या उपक्रमाला भरघोस प्रतिसाद लाभला. शिवाय या दालनाची जागा साहित्यिक, सांस्कृतिक उपक्रमांना विनामूल्य देण्यात येणार आहे. 'अक्षरसाहित्य'च्या या उद्‌घाटनाबरोबरच यादिवशी अस्मिता पांडे आणि कौशल इनामदार यांचा विंदांच्या कवितांवर त्यांच्या शताब्दीस्मरणनिमित्ताने बहारदार कार्यक्रम झाला. डॉ. अनुराधा पोतदार यांचा सत्कार आणि साहित्य संघाच्या 'तिसऱ्या पिढीचे आत्मकथन' या पुस्तकाचे प्रकाशनही झाले. याचे संपूर्ण आयोजन, सूत्रसंचालन सुहासिनी कीर्तिकरांचे होते. श्रोत्यांचा अभूतपूर्व प्रतिसाद या कार्यक्रमाला लाभला. वाचकहो, आपलाही प्रतिसाद अपेक्षित आहे.

## पाठारे प्रभू चॅरिटीज

दरवर्षीप्रमाणे चॅरिटीजतर्फे दीपावली संमेलन चॅरिटीजच्या सुरेश विठ्ठल सभागृहात घेण्यात आले. या संमेलनाचे आणि चॅरिटीजचे अध्यक्ष श्री. उदय शंकर मानकर यांनी सर्वांचे स्वागत केले. मान्यवरांची भाषणे झाली. ज्ञातीतील गरजूंना चॅरिटीझतर्फे दीपावलीनिमित्त अध्यक्षांच्या हस्ते पैसे आणि भेटवस्तू सन्मानपूर्वक देण्यात आल्या. ज्ञातीतील इतर दात्यांनीही दानपुण्य कमावले. या संमेलनाची सांगता सुग्रास भोजनाने झाली.

⁕

(पान ३ कॉलम ४ वरून)

''अहो, पण इथं सुख मिळतात ती बिनपैशांची. शिवाय लोकांची माया फुकटच मिळते. वस्तूंच्या एकावर एक मोफत योजनेसारखी. पण मनोऱ्यात सतत खर्च आणि शेजाऱ्यांची माया प्रेम तर सोडाच ओळखही मिळत नाही.''

''अचला, अगं तेव्हा आईबाबांनी अशी सक्ती आपल्यावर केली असती तर चालली असती का आपल्याला? सृष्टीला विचार ना तिची मतं. बोल गं सृष्टी तुला काय वाटतं?''

''बाबा, आई म्हणतायत ते पटतंय मला. पण परिस्थितीच विचित्र झालीय. अनीशची शाळा इथून खूप लांब पडते. कारपूल तर शक्यच नाही. त्याला शाळेत सोडून मोटार परत आणायची नी पुन्हा त्याला संध्याकाळी आणायला जायचं नको वाटतं. स्कूलबसची तर भीतीच वाटते. एवढ्या लांब एवढा लहान मुलगा कसा पाठवायचा? सौरभसाठी जवळ आयजीएसईची शाळाच नाही. अशा परिस्थितीत मतांपेक्षा सोय बघणंच जास्त महत्त्वाचं वाटतंय मला. नी म्हणून सौरभचं म्हणणं मान्य करावंसं वाटतं.''

अचला गप्प बसली. पण तिच्या मनात आलं; मनोऱ्यात जाताना नी नंतरही आपणच माघार घेतली. पण ती फक्त आपणच घेतली. आपल्या सासू सासऱ्यांना फुलासारखं जपायचं म्हणून इथं फ्लॅटमध्ये आणलं होतं. सौरभसुद्धा त्याच भावनेनं आपल्याला मनोऱ्यात घेऊन गेला. चाळीतल्या नी फ्लॅटमधल्या वातावरणात खूप कमी फरक आहे. पण फ्लॅट नी मनोऱ्यामध्ये जमीन अस्मानाचा फरक आहे. कारण खरोखरच अस्मानाची उंची गाठू पाहणारा असतो मनोरा. ती उंची आपण गाठू शकत नाही.

मनोऱ्यानं मात्र आभाळ कवेत घेतलंय.

पण जमिनीच्या आधारावरच तर त्याचं अस्तित्व आहे..

ही मुख्य गोष्टच मनोरा पार विसरून गेलाय...

⁕

## अभिनंदन

∗ श्री. कुणाल कोठारे निर्मितीसहाय्यक असलेल्या गाजणाऱ्या 'रुद्रम' मालिकेत दोन प्रसंगचित्रणात अभिनेत्री मुक्ता बर्वेसोबत सौ. श्रेया शैलेंद्र तळपदे यांचा सहभाग होता.

∗ कलर्स वाहिनीवर कलासंस्कृतीदर्पण सोहळ्यात श्री. नंदू धुरंधर आणि सौ. स्मिता जयकर यांच्या हस्ते काही पारितोषिके दिली गेली.

∗ लोकसत्तेत डॉ. विकास आमटे सदर लिहितात. किल्लारी येथे भूकंपानंतर त्यांनी अभिनव घरे बांधण्याचा प्रयोग केला. या प्रयोगात श्री. रमेश कोठारे या कार्यकर्त्याचा गौरवाने उल्लेख आहे.

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानुजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणाची डायरी

### जनन

| | |
|---|---|
| १७-१०-१७ | सौ. रिशा आणि श्री. अमेय दीपक नायक, कन्या, दहिसर |
| २६-१०-१७ | सौ. देवश्री आणि श्री. निषाद बन्सीधर धुरंधर, कन्या, विलेपार्ले |

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| १५-१०-१७ | सौ. वनिता सतीश कोठारे, | वय ८२, | गोरेगाव |
| २६-१०-१७ | श्रीम. आनंदलक्ष्मी मधुकर विजयकर | वय ८३, | खार |
| २७-१०-१७ | श्री. राजेश सुजीत कीर्तिकर, | वय ४५, | खार |
| २८-१०-१७ | श्री. रजनीकांत चंद्रकांत नवलकर, | वय ६५, | पुष्करणी |
| २८-१०-१७ | श्री. विलास यशवंत कीर्तिकर, | वय ८३, | वाशी, नवी मुंबई |
| ०१-११-१७ | श्रीम. संगीता (सुलोचना) नागेश त्रिलोकेकर, | वय ८४, | बोरीवली |
| ०१-११-१७ | सौ. जान्हवी बाळकृष्ण तळपदे, | वय ७४, | अंधेरी |

## प्रभुतरुणास देणगी

∗ 'प्रभुतरुणा'स भाऊबीज - श्री. मिलिंद मुकुंद वाझकर यांजकडून रु. २००१/-

∗ 'प्रभुतरुण' दिवाळीकरिता श्री. मुकुंद सदाशिव गोरक्षकर यांजकडून रु. १५००/-

∗ 'प्रभुतरुण' दिवाळी अंकाकरिता अनामिक दात्याकडून रु. १००१/-

∗ श्रीम. कस्तुर रवीन्द्र तळपदे यांजकडून रु. १००१/-

∗ श्री. ऋद्धेश कीर्तिकरकडून रु. ५०१/-

∗ सुप्रिया कीर्तिकरकडून रु. ५०१/-

∗ कॉ. सुंदर विनायक नवलकर यांजकडून आजीव सदस्यत्व रु. ५००/-

सर्व देणगीदारांचे आभार.

✳

## अभिनंदन

∗ 'लिव्हींग फूड्स' चॅनेलवर सौ. केतकी राजन जयकर यांनी गुरोळ्या, भुजणं आदी पदार्थांची पाठारे प्रभू थाळी सादर केली.

∗ डॉ. सुमन नवलकर यांचे अनेक दिवाळी अंकांतून साहित्य प्रकाशित झाले. त्यात 'मौज' दिवाळी अंकातील कवितेचा खास उल्लेख करावा लागेल.

∗ प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांचेही चार दिवाळी अंकांतून लेखन प्रकाशित झाले. आकाशवाणीच्या अस्मिता वाहिनीवर नोव्हेंबरच्या दर रविवारी 'साहित्य सौरभ' मधील चर्चा संवादात त्यांचा सहभाग आहे. 'साहित्य अकादमी'वर त्यांची नियुक्ती झाली.

✳

## पाठारे प्रभु सोशल समाज

कनकाईदेवीचा नवरात्रोत्सव पार्ल्याच्या सभागृहात दरवर्षी साजरा केला जातो. या नवरात्रोत्सवाच्या समितीवर विश्वस्त म्हणून श्री. तुषार कीर्तिकर आणि श्री उमेश कीर्तिकर, श्री. अमोघ कीर्तिकर गेली अनेक वर्षे कार्यरत आहेत. श्री. तुषार हे पाठारे प्रभू सोशल समाजाच्या कार्यकारिणीवर निवडून गेल्यापासून या महोत्सवात सोशल समाजालाही आपली कलासेवा रुजू करण्याची संधी त्यांनी दिली. सोशल समाजाचे या नवरात्रोत्सवात सहभागी होण्याचे यंदाचे पाचवे वर्ष. संधीचे सोने करीत समाजाने विविध कार्यक्रम यावर्षी सादर केले. सूत्रसंचालन समाजाध्यक्षा स्वाती राणे यांचे होते, तर आभार उपाध्यक्षा स्वाती जयकर यांनी मानले. सुरवातीला 'सूर निरागस हो' म्हणत गणेशवंदना झाली. सौ. मयुरा गुंजारव नायक यांच्या दिग्दर्शनाखाली विविधांगी नृत्याचे बहारदार अविष्कार सादर झाले. बालकलाकारांनी सादर केलेले 'जय मल्हार' मालिकेचे शीर्षकगीत नृत्य तर कौतुकाचा कळसच होता. कु. किमया अपूर्व कोठारे, कु. मायरा भूषण राणे, कु. अवंती असीत तळपदे, कु. प्रणाली राकेश राणे या मुलींबरोबर कुमार वीर गुंजारव नायक, विवान श्रीपाद आगासकर, पर्जन्य पवन कीर्तिकर, अश्विन असीत तळपदे, यथार्थ मंदार कोठारे या मुलांनी हे नृत्य सादर केले. अश्विन असित तळपदे या मुलाने आपल्या चिमुकल्या गालांना फुगवून सुदीर्घ केलेला शंखध्वनी तर चकीत करणारा होता. इतर नृत्ये भक्तीभाव आळवणारी, दृश्यसुख देणारी अशी ज्ञातीतील कुशल नर्तिकांनी सादर केली. अपूर्वा नितीन कोठारेंचे शास्त्रीय पद्धतीवर आधारीत एकल नृत्य मनमोहक होते. सौ. पूजा मंदार कोठारेंचे मुद्राभाव दिलखेचक होते; तर कु. निष्का दीपक कोठारे, सौ. मयुरा गुंजारव नायक यांचे पदलालित्य वाखाणण्याजोगे होते. या सर्वांना साथ दिली ती कु. अदिती अमीन तळपदे, सौ. श्वेता असित तळपदे, सौ. जान्हवी रितेश कीर्तिकर, सौ. पल्लवी परेश कोठारे, सौ. संजना दीपक कोठारे, सौ. वैदेही राकेश राणे यांनी. नेत्रसुख देणाऱ्या या विविध नृत्यांबरोबरच कान तृप्त करणारी भक्तीभाव परिपूर्ण गीते सादर झाली. त्यात सौ. रॉनिका सचिन विजयकर, श्रीम. मधु धुरंधर आणि श्रीम. क्षमा कोठारे यांनी बाजी मारली. सौ. रजनी नितीन कोठारे, सौ, योगिता किरण नवलकर, सौ. स्नेहा अजित राणे, सौ. वीणा प्रवीण अजिंक्य या गायिकांनीही देवी भक्तीपर गीते सादर करीत आपली सेवा कनकाई देवीपुढे रुजू केली. गीतांना योग्य साथ दिली संवादिनीवर श्री. प्रभु देसाई यांनी आणि तबल्यावर श्री. अवधूत चौबळ यांनी.

या सर्व कलाकारांना कनकाई देवी ट्रस्टतर्फे आशीर्वाद म्हणून भेट देण्यात आली. श्री. तुषार कीर्तिकरांनीही सर्व कलाकारांना पारितोषिके देऊन गौरविले. देवीचा प्रसाद म्हणून सर्व उपस्थितांना विश्वस्त तुषार कीर्तिकर आणि श्री. उमेश आणि श्री. अमोघ कीर्तिकरतर्फे सुग्रास भोजनाचा लाभ झाला. कानकाई देव्यै नमो नमः।

## हौशी कला मंदीर

''हौशी कलामंदिर''चा दीपोत्सव नेहमीप्रमाणे दि. १८-१०-२०१७ रोजी वांद्र्याच्या 'रंगशारदा'मध्ये साजरा झाला. यावेळचे नाटक होते 'नऊ कोटी सत्तावन लाख'. या प्रहसनात्मक नाटकाच्या मध्यंतरात प्रमुख पाहुण्या डॉ. अनिता सुनील कोठारे यांचा सत्कार झाला. डॉ. अनितांनी आपल्या भाषणात कै. प्रमोद नवलकर, कै. विहंग नायक यांच्या ऋणाचा उल्लेख केला. संस्थांना जास्तीत जास्त देणग्या देऊन प्रोत्साहन द्यावे असे आवाहन करीत 'हौशी कला'ला त्यांनी दहा हजारांची देणगी दिली. याप्रसंगी नाटकातील कलाकारांचाही सत्कार करण्यात आला. डॉ. अनिताचा परिचय सौ. रीमा धुरंधर लाकडावाला यांनी करून दिला. सूत्रसंचालन श्री. अतुल नायक यांचे होते. नाटकानंतर दरवर्षीप्रमाणे 'लकी डीप्स' झाली. वांद्रे ते अंधेरी आणि वांद्रे ते ठाकूरद्वार अशी बसची व्यवस्था करण्यात आली होती.

✳

## चुकीची दुरुस्ती

सप्टेंबर महिन्यातील 'अभिनंदन' सदरातील तपशील कृपया खालीलप्रमाणे वाचावा-

श्री. अलोक विनोद प्रधान यांची रीजनल कम्युनिकेशन मॅनेजरपदी रोश फार्मामध्ये नेमणूक झाली. ते एशिया पॅसिफिक प्रमुख आहेत.

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67